# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य State महाराष्ट्र जिल्हा District मुंबई पोलीस ठाणे Police Station लाप्रवि पहिली खबर क्र. FIR No. 32 वर्ष Year २०२५ दिनांक Date ११/१२/२५

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम कलमे Sections ७
(ii) अधिनियम Act ........ कलमे Sections ........
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day - तारीख पासून Date from जुलै वेळ Time २०२४ तारीख पर्यंत Date to १०/१२/२५ वेळ Time १४:००

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.०० (2) ०३.०० ते ०६.०० (3) ०६.०० ते ०९.०० (4) ०९.०० ते १२.०० (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.०० (7) १८.०० ते २१.०० (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date १०/१२/२०२५ वेळ Time १४:०० वा.

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ०२/२५ तारीख Date ११/१२/२०२५ वेळ Time ०२/४५ वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information समक्ष लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ०२ कि.मी. चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O. P. Name and No. ला. प्र. वि.

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name मुंबई विद्यापीठ ठिकाणाचे नंबर No. if any - गल्ली Ward परिक्षाभवन रस्त्याचे नाव Name of road वाणिज्यकक्ष

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place कलिना गाव Village सांताक्रुझ पोस्ट Post वाकोला तालुका Taluka - जिल्हा Dist. मुंबई राज्य State महाराष्ट्र

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name रेश्मा कृष्णाजी काळे (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name कृष्णाजी काळे.

(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ३६ वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ८२२६८५८०३

(e) पारपत्र क्रमांक Passport No. - दिल्याचा दिनांक Date of issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation ........

(g) धर्म Religion हिंदु जात Caste मराठा जनजात Sub-Caste -

(h) पत्ता Address पोलीस वसाहत गल्ली/सर्व्हे नं. Ward कलिना घर/नाव नं. House Name No. ६०८ फोन/मो. नं. Phone No. ८२२६८५८०३५ पॅन नं. Pan No. BCHPK8418C वोटर्स नं. Card No. -

रस्त्याचे नाव Road नवी मुंबई कडे जाणारा जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place हयात हॉटेल गाव Village कलिना पोस्ट Post वाकोला पो. स्टे. P. Stn. सांताक्रुझ

तालुका Taluka - जिल्हा Dist. मुंबई राज्य State महाराष्ट्र सध्याचा पत्ता Present Address पोलीस वसाहत कलिना सांताक्रुझ (पु.)

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

श्रीमती निकिता विजय शगोड, वय-३६ वर्षे, वरिष्ठ लिपिक, मुंबई विद्यापीठ ४०००९८ पत्ता - रा. रुम नंबर - १५०२, डायमंड इन्क्लेव्हसी, कॉम्प्लेक्स, १५ वा माळा, हाजीमलंग रोड, कल्याण (पुर्व) ३१०६



Scanned with OKEN Scanner

फिर्यादी नामे रेश्मा कृष्णाजी काळे, पो.नि. ला.प्र.वि. मुंबई यांचा दिनांक - 10/12/2025 रोजी संगणकावर टंकलिखीत केलेला जबाब हाच नमुद गुन्ह्याचा प्रथम खबरी अहवाल म्हणुन संबोधण्यात येत असुन गुन्ह्याच्या कागदपत्रांमध्ये तो जबाब समाविष्ट केलेला आहे.

समक्ष
(हरिदास किल्लेदार)
[signature]
सहाय्यक पोलीस आयुक्त
ला.प्र.वि. मुंबई विभाग.

फिर्यादी
[signature]
(रेश्मा कृष्णाजी काळे)
पोलीस निरीक्षक
ला.प्र.वि. मुंबई

Scanned with OKEN Scanner

फिर्याद दिनांक १०/१२/२०२५

मी, रेखा कृष्णाजी काळे, वय ३७ वर्षे, व्यवसाय : नोकरी (पोलीस निरीक्षक), नेमणुक— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, मुंबई, ग.ठि. फ्लॅट १०८, टि—०१ बिल्डिंग, कोळेकल्याण, नविन पोलीस वसाहत, कलीना, सांताक्रुझ (पुर्व), मुंबई—४०००५५, मो.क्र. ९२२६८५८०३५.

मी वरील प्रमाणे असून, दिनाक २८/०८/२०२५ पासून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे पोलीस निरीक्षक या पदावर नेमणुकीस आहे.

मी बुधवार दिनांक १०/१२/२०२५ रोजी कार्यालयात कर्तव्यावर हजर असताना, मा.अप्पर पोलीस आयुक्त, ला.प्र.वि. मुंबई यांचेकडील पडताळणी कारवाई क्र. ८७/२०२५ मध्ये पडताळणी व सापळा कारवाईकरीता माझी व पर्यवेक्षण अधिकारी म्हणुन सहाय्यक पोलीस आयुक्त हरिदास किल्लेदार यांची नेमणुक केल्याबाबात आदेश मिळाल्याने नमुद पडताळणी मधील तक्रारदार श्री. हर्षद मारूती धुमाळ, वय २८ वर्षे यांचेकडे त्यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने चर्चा केली. त्यांनी सांगितले की, त्यांनी महात्मा फुले एज्युकेशन सोसायटी नाईट कॉलेज, भोईवाडा, मुंबई येथे सन २०१४ साली बी.कॉम प्रथम वर्षात ॲडमिशन घेतले होते. त्यांनी सन २०१७ पर्यत कॉलेज पुर्ण केले. परंतु त्यांच्या पाचव्या आणि सहाव्या सेमीस्टरचा एक—एक विषय राहीले होता. त्यामुळे तक्रारदार यांनी सन २०१८ मध्ये पाचव्या सेमीस्टरची परीक्षा देवुन पास झाले व त्यानंतर सहाव्या सेमीस्टरची परीक्षा त्यांनी सन २०२३ व २०२५ मध्ये दिली. त्यानंतर तक्रारदार धुमाळ यांनी दिलेल्या परिक्षेचा दिनांक २२ मे २०२५ रोजी निकाल लागला. सदरचा निकाल त्यांनी ऑनलाईन चेक केला असता त्यामध्ये ते पास झाल्याचे त्यांना समजले. त्यानंतर ते साधारण जुन २०२५ या महिन्यामध्ये त्यांचा परिक्षेचा रिझल्ट आणण्यासाठी मुंबई युनिव्हर्सिटी, कलीना कॅम्पस, सांताक्रुझ (पुर्व) मुंबई या कार्यालयात गेले. त्यावेळी तक्रारदार धुमाळ सदर कार्यालयातील वरिष्ठ लिपीक, श्रीमती निकीता राठोड यांना भेटले व त्यांचेकडे रिझल्टची मागणी केली असता वरिष्ठ लिपीक निकिता राठोड यांनी तक्रारदार धुमाळ यांना ते शिकत असलेल्या कॉलेजमध्ये रिझल्ट घेण्यास जाण्यास सांगितले. त्यावर तक्रारदार धुमाळ हे त्यांच्या कॉलेजमध्ये गेले असता त्यांना तेथून पुन्हा मुंबई युनिव्हर्सिटी येथे रिझल्ट घेण्यासाठी पाठविण्यात आले. त्यावर त्यांनी मुंबई युनिव्हर्सिटी कलीना येथे जावून दिलेल्या परिक्षेमध्ये पास झालेल्या रिझल्टची चौकशी केली असता तक्रारदार धुमाळ यांनी पुन्हा निकीता राठोड यांची भेट घेतली. त्यावेळी निकिता राठोड यांनी तक्रारदार धुमाळ यांना उडवाउडविची उत्तरे दिली. त्यावेळी तक्रारदार धुमाळ यांनी निकिता राठोड यांना पुन्हा विचारले असता त्यांनी तक्रारदार धुमाळ यांना १५ दिवसानंतर येण्यास सांगीतले.

त्यानंतर तक्रारदार धुमाळ यांनी साधारण १५ ते २० जुलै च्या दरम्यान पुन्हा कलीना युनिव्हर्सिटी, सांताक्रुझ (पुर्व) मुंबई येथे जावुन निकीता राठोड यांची भेट घेतली. त्यावेळी निकिता राठोड यांनी तक्रारदार धुमाळ यांना "त्यांचे २०१४ चे ॲडमिशन असुन त्याचा १० वर्षाचा गॅप आहे. त्यामुळे ५५,०००/— रुपये दंडाची रक्कम भरावी लागेल" असे सांगीतले. त्यावेळी तक्रारदार धुमाळ यांनी ५५,०००/— रुपये रक्कम भरायची तयारी दर्शविली. त्यानंतर निकिता राठोड यांनी तक्रारदार धुमाळ यांना सांगितले

Scanned with OKEN Scanner

की, ते त्यांच्या वरिष्ठांना विचारुन सदरचे काम होईल की नाही याबाबत सांगते असे बोलुन तक्रारदार धुमाळ यांना १ महिण्यानंतर येवुन भेटण्यास सांगीतले.

दिनांक १५/०९/२०२५ रोजी तक्रारदार धुमाळ हे कलिना युनिव्हर्सिटीमध्ये गेले असता निकीता राठोड यांना भेटले त्यावेळी तक्रारदार धुमाळ यांची निकिता राठोड यांच्याशी त्यांच्या रिझल्टच्या कामासंदर्भात चर्चा केली व तक्रारदार धुमाळ यांनी निकिता राठोड यांना सांगितले की, ५५,००० रुपये रक्कम खुप जास्त आहे यामध्ये काही कमी करता येईल का? असे विचारले असता त्यावेळी निकिता राठोड यांनी तक्रारदार धुमाळ यांना ठिक आहे मी बघते, काही करता येईल का? असे सांगून तक्रारदार धुमाळ यांना परत एक महिण्यानंतर येण्यास सांगितले म्हणुन तक्रारदार धुमाळ हे दिनांक १७/११/२०२५ रोजी कलीना युनिव्हर्सिटीमध्ये गेले. त्यावेळी तक्रारदार धुमाळ हे निकीता राठोड यांना भेटले. त्यावेळी निकिता राठोड यांनी तक्रारदार धुमाळ यांना २५०००/- रुपये आणुन देण्यास सांगीतले त्यावर तक्रारदार धुमाळ यांनी निकिता राठोड यांना एवढे शक्य नसल्याचे सांगीतले.

त्यानंतर तक्रारदार धुमाळ यांनी दिनांक १८/११/२०२५ रोजी त्यांच्या आईच्या नावे असलेल्या बँक अकाउंटवरुन १५,००० रुपये युनिव्हर्सिटीतील एटीएम मधुन काढून त्यांची ईच्छा नसताना ही त्यांनी निकीता राठोड यांना दिले. त्यावेळी निकिता राठोड यांनी तक्रारदार धुमाळ यांनी कॉलेजची ५००/- रुपये पेनल्टी भरण्यास सांगीतले असता तक्रारदार धुमाळ यांनी त्यांच्या जवळ असलेले ५००/- रुपये कॅश भरली सदरबाबत निकिता राठोड यांनी तक्रारदार धुमाळ यांना पावती क्रमांक ५६०८ प्रमाणे पोहोच दिली. त्यानंतर त्यांनी तक्रारदार धुमाळ यांना रिझल्ट घेण्यासाठी एक आठवडयांनी येण्यास सांगीतले. त्यानंतर ३-४ दिवसांनी निकीता राठोड यांनी तक्रारदार धुमाळ यांना दुसऱ्याच्या नंबर वरुन कॉल करून त्यांचा रिझल्ट तयार आहे असे सांगून तक्रारदार धुमाळ यांच्याकडे पैशाबाबत विचारणा केली असता तक्रारदार धुमाळ यांनी त्यांची अर्थिक अडचण असल्याचे त्यांना सांगीतले. त्यापुढे निकीता राठोड यांनी त्यांचा मोबाईल नंबर ९७६७९३५७७७ वरुन तक्रारदार धुमाळ यांना त्यांचा मोबाईल क्र ८१०८०१४३२३ यावर व्हॉटसअप कॉल तसेच नॉर्मल फोन कॉल करुन वारंवार पैशाची मागणी करत तगादा लावला होता.

आज दिनांक १०/१२/२०२५ रोजी तक्रारदार धुमाळ यांनी मुंबई युनिव्हर्सिटी, कलीना, मुंबई येथे जावून निकीता राठोड यांची भेट घेतली असता निकिता राठोड यांनी तक्रारदार धुमाळ यांना पहील्या मजल्यावर पाठवून त्यांचा रिझल्ट घेण्यास सागितले. त्याप्रमाणे तक्रारदार धुमाळ यांनी सदर कार्यालयातील पहिल्या मजल्यावर जावून त्यांचा रिझल्ट ताब्यात घेतला. त्यानंतर तक्रारदार धुमाळ यांनी निकिता राठोड यांना फोन करून त्यांचा रिझल्ट त्यांच्या ताब्यात मिळाल्याबाबत सांगितले. त्यावेळी निकिता राठोड यांनी तक्रारदार धुमाळ यांना त्यांच्या कार्यालयात परत बोलावल्यावरून तक्रारदार धुमाळ परत निकिता राठोड यांच्या कार्यालयात परत गेले. तक्रारदार धुमाळ कार्यालयात परत आल्यावर निकिता राठोड यांनी तक्रारदार धुमाळ यांच्याकडून त्यांचा रिझल्ट त्यांच्या ताब्यात घेवून त्यांच्याकडे तक्रारदार धुमाळ यांच्या रिझल्टची एंट्री राहिली व कॉन्वोकेशनसाठी रिझल्ट लागणार आहे असे सांगून बाकीच्या पैशांचे काय झाले? यांबाबत विचारणा केली. त्यावेळी तक्रारदार धुमाळ यांनी निकिता राठोड यांना १५,०००/- रुपये आणले असल्याचे सांगून त्यांच्याकडे पैसे देण्यासाठी इन्व्होलप

Scanned with OKEN Scanner

नसल्याचे सांगीतले. त्यावेळी निकीता राठोड यांनी तक्रारदार धुमाळ यांना त्यांचेकडील युनिव्हर्सिटीचा इन्व्होलप दिला व यामध्ये पैसे आणून दे असे सांगीतले.

श्री हर्षद मारूती धुमाळ यांचेकडे त्यांचा रिझल्ट ताब्यात देण्याकरीता रू. १५,०००/— रूपये लाचेची मागणी होत असल्याबाबतची खात्री झाल्याने व त्यांना सदरची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक १०/१२/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय वरळी मुंबई येथे लोकसेविका निकिता राठोड यांच्या विरोधात तक्रार देण्यास आले असल्याचे त्यांनी सांगितले. तक्रारदार धुमाळ यांना लिहिता वाचता येत असल्यामुळे त्यांच्याकडून त्यांच्या स्वहस्ताक्षरात मराठीमध्ये लोकसेविका यांचे विरूध्द तक्रारीअर्ज लिहुन घेतला.

तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने पुढील कारवाईकरीता शासकीय पंचांची आवश्यकता असल्याने प्रभारी अंमलदार पो.ह. कावले यांच्यामार्फतीने दोन शासकीय पंच नामे १) श्री. हनुमंत पोपट गेळे, वय ५१ वर्षे, व्यवसाय — नोकरी, पद — सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक, कार्यालयीन पत्ता — प्रादेशिक परिवहन कार्यालय, अंधेरी मुंबई (पश्चिम), पिनकोड नंबर ४०००५३. रा.ठि — फ्लॅट नंबर ४०३, सचिन को.ऑप.हौ. सोसा., मॉडेल टाऊन, वर्सोवा, अंधेरी, मुंबई ४०००५३ २) श्री. मंगल रामनाथ अंजारकर, वय ५६ वर्षे, व्यवसाय — नोकरी, पद — शिपाई, (अनुज्ञापन अधिक्षक कार्यालय) कार्यालयीन पत्ता — १२१, रामचंद्र भट मार्ग, बाबुलाल टँक क्रोस लेन, जे. जे.हॉस्पीटल समोर, डोंगरी, मुंबई ४०००९ . रा.ठि — रामदुत बिल्डिंग नंबर ०३, रूम नंबर ३५३, दुसरा मजला, महादेव पालव मार्ग, करीरोड, मुंबई —४०००१२ यांना पाचारण केले. दोन्ही पंच कार्यालयात हजर झाल्यानंतर आम्ही त्यांना तक्रारदार यांची प्रथम ओळख करुन दिली. तसेच त्यांच्या तक्रारीविषयी थोडक्यात हकिगत सांगून, तक्रारदार यांचा तक्रारी अर्ज पंचाना वाचण्यास दिला. पंचांचा तक्रारी अर्ज वाचून झाल्यानंतर त्यावर समक्ष म्हणून आम्ही व पर्यवेक्षण अधिकारी म्हणुन सपोआ हरिदास किल्लेदार, तसेच दोन्ही पंचानी स्वाक्षरी करून सदरचा अर्ज आमचे ताब्यात घेतला.

तद्नंतर सपोआ हरिदास किल्लेदार यांनी पंचासमक्ष सांगितले की, तक्रारदार धुमाळ हे लोकसेविका निकिता राठोड यांची प्रत्यक्ष भेट घेण्याआधी त्यांना त्यांचे मोबाईल फोनवर कॉल करून भेटीची वेळ व ठिकाण याबाबत विचारणा करणार आहेत. त्यानुसार सपोआ हरिदास किल्लेदार, आम्ही, दोन्ही पंच, तक्रारदार असे लाप्रवि कार्यालयातील तांत्रिक कक्षात गेलो. सदरवेळी तांत्रिक कक्षातील पो.ह. मठपती यांच्या मदतीने तक्रारदार व दोन्ही पंचांना व्हॉईस रेकॉर्डरची माहिती देवून पडताळणी दरम्यान घ्यावयाच्या दक्षताबाबत सुचना दिल्या. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मायक्रो एस.डी.कार्ड टाकुन माझे, तक्रारदार व दोन्ही पंच यांचे प्रथम बक्तव्य ध्वनिमुद्रीत करण्यात आले. तद्नंतर तक्रारदार हे लोकसेविका निकिता राठोड यांस मोबाईलवर संपर्क करणार असल्याने पो.ह. मठपती यांचेमार्फतीने व्हॉईस रेकॉर्डर चालू करून तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल नं. ८१०८०१४३२३ यावरून स्पीकर ऑन करून लोकसविका श्रीमती निकिता राठोड यांस त्यांचे मोबाईल नं. ९७६७९३५७७७ यावर कॉल केला परंतु सदरचा कॉल लोकसेविका निकिता राठोड यांनी उचलला नाही. सदरची वेळ १७:०४ वाजताची होती. त्यानंतर थोडयावेळाने लोकसेविका श्रीमती राठोड यांनी त्यांच्या मोबाईलवरून तक्रारदार धुमाळ यांच्या मोबाईलवर फोन कॉल केला. तक्रारदार धुमाळ यांनी सदरचा फोनकॉल उचलला. सदरवेळी तक्रारदार धुमाळ हे लोकसेविका श्रीमती राठोड यांच्याबरोबर लाचेच्या रक्कमेसंदर्भत चर्चा सुरू करताच लोकसेविका श्रीमती राठोड यांनी तक्रारदार धुमाळ यांना फोन कट करण्यास सांगून त्यांना वॉट्सप कॉल करते असे सांगितले''. त्यावेळी स.पो. आ.किल्लेदार यांनी पो.ह. मठपती यांचेमार्फतीने व्हॉईस रेकॉर्डर चालू करून तक्रारदार धुमाळ व लोकसेविका राठोड यांच्यात झालेले संभाषण ध्वनिमुद्रित केले. सदरची वेळ

Scanned with OKEN Scanner

१७:०८ वाजताची होती. त्यानंतर लोकसेविका राठोड यांनी त्यांच्या मोबाईलवरून तक्रारदार धुमाळ यांच्या मोबाईलवर व्हॉट्सअप कॉल केला. त्यावेळी तक्रारदार धुमाळ यांनी सदरचा व्हॉट्सअप कॉल उचलला सदरवेळी तक्रारदार धुमाळ यांनी लोकसेविका श्रीमती राठोड यांना लाचेची रक्कम कमी करण्यासंदर्भात विनंती करून चर्चा केली. त्यानंतर सदरवेळी स.पो.आ.किल्लेदार यांनी पो.ह. मठपती यांचेमार्फतीने व्हॉईस रेकॉर्डर चालू करून तक्रारदार धुमाळ व लोकसेविका राठोड यांच्यात झालेले मोबाईल व्हॉट्सअप संभाषण ध्वनिमुद्रित केले. सदरची वेळ १७:०९. वाजताची होती. त्यानंतर नेटवर्क इशुमुळे सदरचे कॉल कट होत असल्यामुळे लोकसेविका श्रीमती राठोड तक्रारदार धुमाळ यांना लाचेची रक्कम घेवून येण्याकरीता वारंवार व्हॉट्सअप कॉल करत होते.

वरील तक्रारदार व लोकसेवक यांचे मोबाईलवरील झालेल्या ध्वनिमुद्रीत संभाषणावरून लोकसेविका श्रीमती. निकिता राठोड यांनी तक्रारदार धुमाळ यांना तडजोडीअंती लाचेची रक्कम रू. १०,०००/– घेवून सायंकाळी ०६.०० वाजे पर्यत मुंबई विद्यापीठ, कलिना कार्यालयात घेवून येण्यास सांगितले. यावरुन लोकसेविका श्रीमती. निकिता राठोड हे तक्रारदार धुमाळ यांचे रिझल्ट देण्याकरीता पंचावन हजार रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती १०,०००/– स्विकारण्याचे मान्य केल्याचे दिसून आले. तसेच लोकसेविका यांनी तक्रारदार यांना लाचेची रक्कम आज रोजी सायंकाळी ०६:०० वा. पर्यंत घेवून येण्यास सांगितले.

लोकसेविका श्रीमती राठोड यांनी तक्रारदार धुमाळ यांच्याकडे लाचेची मागणी झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर लागलीच सापळा कारवाईचे आयोजन करण्याचे आम्हा सर्वानुमते ठरले. त्यानंतर सपोआ किल्लेदार यांनी पंच तक्रारदार व पोलीस पथकास सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाची व करावयाची कारवाई याबाबत सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना लाचेच्या रक्कमे बाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी त्यांचेकडील बचतीतील रूपये दहा हजार रक्कम घेवुन आल्याचे सांगितले. तक्रारदार यांचेकडील उपलब्ध लाचेची रक्कम रू.१०,०००/– (त्यामध्ये रू.५००/– दराच्या भारतीय चलनाच्या २० नोटा) यांच्या झेरॉक्स काढण्यात आल्या. त्यानंतर पो.ह. कावले यांनी पंच व तक्रारदार यांना अॅन्थ्रोसिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगितले. पो. ह. कावले यांनी लाच म्हणून वापरण्यात येणाऱ्या रू.१०,०००/– रक्कमेतील नोटांना अॅन्थ्रोसिन पावडर लावून ती लाचेची रक्कम लोकसेविका श्रीमती राठोड यांनी दिलेल्या इनव्होलपमध्ये ठेवुन सदर इनव्होलपला देखील बाहेरून अॅन्थ्रोसिन पावडर लावून ते इनव्होलप तक्रारदार यांच्या काळया रंगाच्या सॅकच्या पहिल्या कप्प्यात ठेवली. त्यानंतर सपोआ किल्लेदार यांनी पोह. कावले हे सापळा कारवाईमध्ये भाग घेणार नसल्याचे सांगितले.

त्यानंतर आम्ही, सपोआ किल्लेदार, दोन्ही पंच, व पथकातील अंमलदार सापळा कारवाई करिता दोन शासकिय वाहनाने सायंकाळी ०५.३० वाजता लोकसेविकेचे कार्यालय निकाल कक्ष, दुसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज भवन बिल्डिंग, मुंबई विद्यापीठ कलीना, मुंबई येथे रवाना झालो. सदर कार्यालयाच्या गेटवर पोहचल्यावर लोकसेविका श्रीमती राठोड यांनी त्यांच्या मोबाईलवरून तक्रारदार धुमाळ यांच्या मोबाईलवर पुन्हा फोनकॉल केला. सदरचा कॉल तक्रारदार धुमाळ यांनी उचलला सदरवेळी लोकसेविका यांनी तक्रारदार यांना "कुठे आहात? असे विचारले त्यावेळी तक्रारदार यांनी लोकसेविका यांना कार्यालयाच्या गेटवर आहे असे सांगितले. त्यावेळी लोकसेविका यांनी तक्रारदार यांना सांगितले की, ठिक आहे, दुसऱ्या मजल्यावरील कार्यालयात या. असे सांगितले. सदरवेळी स.पो.आ.किल्लेदार यांनी पो.ह. मठपती यांचेमार्फतीने व्हॉईस रेकॉर्डर चालू करून तक्रारदार धुमाळ व लोकसेविका राठोड यांच्यात झालेले मोबाईल संभाषण ध्वनिमुद्रित केले. सदरची वेळ १७:५५ वाजताची होती.

Scanned with OKEN Scanner

त्यांनतर लोकसेविकाचे कार्यालयाच गेटच्या आत मध्ये गेल्यावर २०० मीटर अंतरावर थांबुन सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येणार असुन तक्रारदार यांच्या सोबत पंच क्रमांक ०१ हनुमंत गेळे यांना लोकसेविकास लाचेची रक्कम देण्याकरीता पाठविण्याचे ठरले. त्यानंतर स.पो.आ.किल्लेदार यांनी तक्रारदार यांना लाच रक्कम स्विकारल्याचा इशारा म्हणून तक्रारदार यांनी परिधान केलेल्या फुलबाहयाच्या शर्टच्या बाहया फोल्ड करून इशारा दाखविण्याबाबत सांगण्यात आले. त्यानंतर टेक्निशियन मठपती यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार यांच्या शर्टाच्या आतील बाजूस बनियानला लावून पंच क्रमांक ०१ हनुमंत गेळे यांच्यासह लोकसेवक यांच्या कार्यालयामध्ये रवाना केले. त्यांनतर इतर पथक लोकसेवकाच्या कार्यालयाचे ठिकाणी पोहचले व संशय येणार नाही अशाप्रकारे थांबुन राहिले. थोडया वेळाने तक्रारदार हे लोकसेवकाच्या कार्यालयामधुन बाहेर आले व त्यांनी ठरले प्रमाणे तक्रारदार यांनी परिधान केलेल्या फुलबाहंयाच्या शर्टच्या बाहया फोल्ड करून लोकसेविकेने लाच स्विकारले बाबत इशारा केला. त्यानंतर लगेच आम्ही व सापळा पथकाने लागलीच पंचांसह लोकसेविका श्रीमती. निकिता राठोड यांना १८:०० वा लाचेच्या रक्कमेसह रंगेहाथ पकडले. सदर लोकसेविकेस त्याचे नाव व पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव निकिता विजय राठोड वय ३६ वर्षे, धंदा नोकरी पद – वरिष्ठ लिपीक (नेमणुक : निकाल कक्ष, दुसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज भवन बिल्डिंग, मुंबई विद्यापीठ कलीना, मुंबई ) असे सांगितले. तसेच त्यांचा राहण्याचा पत्ता विचारला असता रूम नंबर १५०२, डावखर इलिगन्सी कॉम्पलेक्स, १५ वा माळा, हाजीमलंग रोड, कल्याण (पुर्व) असे सांगितले. सापळा कारवाईबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.

तरी लोकसेविका निकिता विजय राठोड वय ३६ वर्षे, धंदा नोकरी पद – वरिष्ठ लिपीक (नेमणुक : निकाल कक्ष, दुसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज भवन बिल्डिंग, मुंबई विद्यापीठ कलीना, मुंबई) यांनी तक्रारदार श्री. हर्षद मारूती धुमाळ यांचे बी.कॉम परिक्षेचा रिझल्ट देण्याकरीता माहे जुलै २०२५ मध्ये ५५,०००/– रूपयाची मागणी केली व दिनांक १८/११/२०२५ रोजी लोकसेविका निकीता राठोड यांनी १५,०००/– रुपये स्विकारले. त्यानंतर दिनांक १०/१२/२०२५ रोजी पंचांसमक्ष पडताळणी दरम्यान तडजोडीअंती १०,०००/– रुपये मागणी केली व दिनांक १०/१२/२०२५ रोजी सापळा कारवाईच्यावेळी १०,०००/– रुपये इतकी लाचेची रक्कम तक्रारदार यांचेकडून स्विकारताना त्यांना रंगेहाथ पकडले, म्हणुन माझी त्यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ अन्वये कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष,

[signature]

( हरिदास किल्लेदार )
सहायक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

[signature]

( शैला कृष्णाजी काळे )
पोलीस निरीक्षक
ला. प्र. वि. मुंबई

Scanned with OKEN Scanner

आमोसे

... / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ नाही.

Reasons for delay in reporting by the complainant/informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

१०,०००/- रुपये

(a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........ १०,०००/- रुपये

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........ नाही.

Unnatural / Accidental Death Case No., if any.

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page. बी. कॉम. या पदवीच्या अंतिम वर्षाच्या

तक्रारदार यांचे मुंबई विद्यापीठातून ... यातील आरोपीत लोकसेवकाने तक्रारदार

परीक्षेत मार्कशीट देण्याकरिता) यातील आरोपीत लोकसेवकाने लाचेची मागणी करून तडजोडीअंती दिनांक

यांच्याकडे प्रथम ५५,०००/- रुपये लाचेची मागणी व दि. १०/१२/२०२४ रोजी २०,०००/- रु.

१८/११/२०२४ रोजी १५,०००/- रुपये व तक्रारदार यांचेकडून आरोपीत लोकसेवकाने

रक्कम पंचासमक्ष स्विकारली म्हणून भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम -१९८८ चे कलम-७ प्रमाणे गुन्हा

विरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम नोंद.

13. केलेली कार्यवाही –1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : श्रीमती. रजनी उंबरकर - पोलीस निरीक्षक

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ........ नाही.

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........ जिल्हा ........ राज्य ........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) ........ Rank ........ No. ........
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ........

(3) Transferred to P. S. ........ on point of jurisdiction.
District ........

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant/Informant

संपूर्ण नाव Name श्री. हरिदास किल्लेदार

पदनाम Rank सहाय्यक पोलीस आयुक्त

तपासिक अ. चा कोड क्रं. ला. प्र. वि. मुंबई.

Posting

Code No. of I. O. ........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ११/१२/२०२४

1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक ( संगणक ), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with OKEN Scanner